# सुख शांती समाधान



पौर्णिमा म्हटले लगेच समोर तो आकाशात आलेला पूर्ण चंद्र. त्याची ती शितल छाया मनाला मोहून टाकते. चंद्राच्या प्रकाशाने मन अगदी शांत आणि एकाग्र होते. त्याचप्रमाणे पौर्णिमा ही देवीच्या पुजेसाठीही महत्त्वाची मानली जाते. पौर्णिमेच्या दिवशी केलेली पूजा व उपासनेचा लाभ काही पटीने जास्त होतो, असे म्हटले जाते. त्या दिवशी आपल्या मनात काही चांगल्या इच्छा असतील तर त्या पूर्ण होण्यासाठी या दिवशीच्या पूजेने लाभ होतो.



**शास्त्राप्रमाणे** प्रत्येक पौर्णिमेला सकाळी दहा वाजता पिंपळाच्या वृक्षावर देवी लक्ष्मीचे आगमन होते. म्हणून ज्या व्यक्तीला आर्थिक विवंचना असतील त्या व्यक्तीने यावेळी पिंपळाच्या वृक्षाची व लक्ष्मीची आराधना करावी. एखाद्या शुक्रवारी कमलपुष्प आणून ते लाल कपड्यात गुंडाळून आपल्या तिजोरीत किंवा कपाटात ठेवल्यास तिजोरीतील धनाचा साठा वेगाने वाढू लागतो. त्याबरोबर कष्ट करावे व काम करावे.

प्रत्येकाला वाटते की आपले स्वतः चे हक्काचे घर असावे. पण त्यासाठी खूप कष्ट करून प्रयत्न करूनही ते होत नसेल तर पौर्णिमेच्या दिवशी सकाळी स्नान करावे. ईशान्य दिशेला पाट किंवा चौरंग मांडावा त्यावर चांदीचा किंवा तांब्या एक तांब्या ठेवावा त्यात तुळशीची पाने व एक सुपारी घ्यावी ती सुपारी वास्तू पुरुष आहे असे समजून त्या सुपारीस गंध व फुल वाहून तिची मनोभावे व श्रद्धेने पूजा करावी व ती सुपारी त्या तांब्यात ठेवावी. तांब्याच्या तोंडावर आंब्याची पाने ठेवून त्यावर एक भांडे ठेवावे व त्या तांब्याचीही पूजा करावी. त्या तांब्याला गंध लावावे, फुल वाहावे. त्यानंतर खालील प्रार्थना करून वास्तु पुरुषास आवाहन करावे.

प्रार्थना- 'हे वास्तुपुरुषा आम्ही तुझ्या आश्रयाला आलो आहोत, आम्हास इच्छित वास्तू प्राप्त होऊ दे, तिथे आम्ही मनोभावे तुझी पूजा अर्चना करू' या आवाहनानंतर पुढील मंत्र १०८ वेळा म्हणावा- 'ओम वास्तू पुरुषाय नमः।'

या मंत्राने राहत्या घरातदेखील शांतता नांदेल, या दिवशी घरात दुपारी जेवणात एखादा गोड पदार्थ करावा व वास्तू पुरुषास त्याचा नैवेद्य दाखववा संध्याकाळी पूजेचे विसर्जन करावे.



पौर्णिमेची धनप्राप्ती उपासना

इच्छित धनप्राप्तीसाठी अष्टमीपासून पौर्णिमेपर्यंत रोज रात्री चंद्राला दही भाताचा नैवेद्य दाखववा. नैवेद्याचा दहीभात केळीच्या पानावर ठेवावा केळीचे पान शक्य नसेल तर चांदीची छोटीशी वाटी अगर ताटली असली तरी चालेल, या दिवसांत केव्हातरी गरजू माणसाला वस्त्रदान करावे. मात्र त्याला त्या वस्त्राचा कपडा शिवता येईल इतके कापड द्यावे हे जमलं नाही तर एखादा पंचा, टॉवेल किंवा निळसर रंगाचा हात रुमाल द्यावा. येत्या पौर्णिमेला चंद्राला महानैवेद्य अर्पण करावा, नैवेद्य पानाजवळ एक गाईच्या तुपाचा दिवा प्रज्वलित करावा व नैवेद्याचे ताट आपण खावे त्यात जेवढे आहे तेवढेच खाणे ह्या तोडग्याने नक्कीच धन प्राप्त होण्याचे जे मार्ग आहे त्यातून अधिक प्रमाणातून धनप्राप्ती होईल.

लवकर विवाह होण्यासाठी

काहीना काही कारणामुळे विवाह जुळून येण्यास अडचणी येत असल्याची अनेक उदाहरणे आपण पाहतो. मंगळ दोषामुळे विवाह जुळून येण्यास विलंब होतच असतो. पण इतर ग्रहमान, वास्तुदोष यासारख्या कारणामुळे विवाह जुळून येण्यास अडचणी येतात. या अडचणी दूर होण्यासाठी पौर्णिमेच्या दिवशी पार्वती स्वयंवर हे स्तोत्र १०८ वेळा किंवा किमान सात वेळा तरी पठण करावे. त्यामुळे हळू हळू इतर ग्रह दोष कमी होण्यास मदत होईल आणि विवाहासाठी योग्य मार्ग मोकळा होईल.

बाळार्कायुतसत्प्रभां करतले  
लोलम्बमालाकुळाम्  
माला सन्दधती मनोहरतनू  
मंदस्मितोधन्मुरविम  
मंद मंद मुपेयुषी वरयिन्तु  
शुंभ जगन्मोहिनू  
वंदे देवमुनींद्रवंदितपदाम्  
इष्टार्थदां पार्वतीम्।।

## धनप्राप्तीसाठी उपाय ...

दारिद्र्य दूर होऊन आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी घराच्या दक्षिण-पश्चिम दिशेची उंची वाढवून घ्यावी व फरशीचा उतार उत्तर-पूर्व दिशेस ठेवावा.

## पुण्य मिळावे यासाठी हे करा...

ग्रहणाच्या वेळी गायींना गोग्रास, पक्ष्यांना अन्न, गरजूंना वस्त्र व त्यांना आवश्यक ती वस्तू दान केल्याने अनेक पट पुण्य मिळते.



## घरात आनंदी वातावरणासाठी...

कुटुंब गुण्यागोविंदाने नांदण्यासाठी घरात ५ रॉडची पवनघंटी बसवून घ्यावी.



## घरात समृद्धी वाढविण्यासाठी मीठाचा असा वापर करा...

जेवणात जर मीठ नसेल तर ते जेवण बेचव असते. जेवणाला मिठाशिवाय चव नाही, असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे आपल्या जीवनात आनंद आणायच्या असेल तर हेच मीठ कामी येते. आपल्या घरात मिठामुळे सकारात्मकता येते. त्याचबरोबर लक्ष्मीचा वास आपल्या वास्तुत राहतो. म्हणून मीठ केवळ चवीसाठी नाही तर याचे इतर उपाय करूनदेखील सुरवात भर घालता येऊ शकते.



- पूर्वीपासून मिठाला वाईटापासून रक्षण करते असे म्हणतात. म्हणूनच तर पूर्वीपासून कुणाची वाईट नजर किंवा बाधा असेल तर मिठाने नजर काढली जात आहे.घरातील एखाद्या व्यक्तीला किंवा घराला दृष्ट लागल्याचे जाणवत असल्यास चिमूटभर मीठ तीन वेळा ओवाळून बाहेर फेकून द्यावे. याने नजर दोष नाहीसा होतो.
- ज्या घरात मुलं असतात ते घर नंदनवन म्हटले जाते. घरात लहान मुलांमुळे चहलपहल असते. घर जिवंत असते. परंतु जर मुले आजारी पडली तर पूर्ण घर काळजीत असते. जर मुले सतत चिडचिड, रडत करत असतील तर त्यांची दृष्ट काढावी. त्याचप्रमाणे मुलांना दृष्ट लागू नये आणि ते निरोगी राहावे यासाठी आठवड्यातून एक दिवस अंघोळीच्या पाण्यात चिमूटभर मीठ टाकून मुलांना त्या पाण्याने अंघोळ घालावी.



- तसेच आपल्या घराच्या बाथरूम व टॉयलेटमध्ये काचेच्या बॉऊलमध्ये मीठ भरुन ठेवावे याने वास्तुदोष दूर होतं. याचे कारण म्हणजे मीठ आणि काच दोन्ही राहूच्या वस्तू असल्याने अशा प्रकारे राहूचे नकारात्मक प्रभाव दूर करण्यात मदत मिळते. राहूला नकारात्मक ऊर्जा आणि कीटक व कीटाणूंचा कारक मानले गेले आहे. यामुळे घरातील सुख-समृद्धी आणि आरोग्यावर प्रभाव पडतो.
- आरोग्याच्या दृष्टीनेही मिठाचा खूप वापर केला जातो. त्यानुसार रात्री झोपताना कोमट पाण्यात चिमूटभर मीठ टाकावे व त्या पाण्याने हातपाय धुवावे, असे केल्याने शरीरावर आलेला ताण गायब होऊन आणि चांगली झोप येते.
- काचेच्या बरणीत मीठ भरून घराच्या कोपऱ्यात ठेवल्याने घरात सकारात्मक ऊर्जेचा संचार होतो. राहू, केतूची दशा सुरू असल्यास मनात वाईट विचार तसेच भीती निर्माण होते अशावेळी हा प्रयोग अत्यंत लाभदायक ठरतो.
- मिठाचे खडे लाल रंगाच्या कपड्यात गुंडाळून घराच्या मुख्य दरवाजाला बांधल्याने घरात वाईट शक्तीप्रवेश करत नाही. व्यवसायात प्रगतीसाठी व्यवसायाच्या ठिकाणी मुख्य दरवाजावर आणि तिजोरीवर अशी पोटली बांधून लटकवावी.
- घरात सकारात्मक ऊर्जेत वृद्धीसाठी तसेच घरात एकोपा राहावा यासाठी वास्तुशास्त्रानुसार घरात रॉक साल्ट लँप ठेवू शकतो. तसेच सुख समृद्धी वाढविण्यासाठीही याचा उपयोग होतो.

# खासगी रूग्णालयात कोरोना लसीचे लाखो डोस पडून! हायकोर्टात याचिका

■ मुंबई, प्रतिनिधी

**कोरोनावर** मात करणार्या लसीचा राज्यातील सरकारी केंद्रावर तुटवडा भासत असताना खाजगी केंद्रांना पुरवठा करणार्या पुरवठादाराकडे मात्र लाखो डोस पडून आहेत. ते सरकारने ताब्यात घ्यावे आणि त्याचा वापर करावा अशी विनंती करणार्या याचिकेची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. न्यायमूर्ती गौतम पटेल आणि न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या खंडपीठाने एकीकडे सरकारी केंद्रांवर लसीचा तुटवडा आणि दुसरीकडे खाजगी केंद्रांना पुरवठा करणार्या पुरवठादारांकडील लसीचे डोस फुकट जाणार असतील तर ही बाब चिंताजनक असल्याचे स्पष्ट करताना वाया जाणार्या या लसीच्या पुरवठ्याबाबत राज्य सरकारचे नेमके धोरण काय आहे, असा सवाल उपस्थित केला. राज्य सरकारने याबाबत भूमिका स्पष्टकरावी, असे निर्दे

● राज्य सरकारचे नेमके धोरण काय? हायकोर्टाचा सवाल

श देत याचिकेची सुनवणी मंगळवार, १५ फेब्रुवारीला निश्चित केली आहे.

राज्य सरकार कोराना लस मोफत देत असल्याने खासगी केंद्रावरील लसीचा उठाव होत नाही. त्यामुळे ही लस पडून असून त्याची मुदत मार्च मध्ये संपत आहे. त्यामुळे राज्य सरकारला ही लस स्वतःच्या ताब्यात घेऊन त्याचा वापर सरकारी पातळीवर करण्याचे आदेश द्या अशी विनंती करणारी याचिका महालक्ष्मी निसर्गोपचार आणि योगा रुग्णालय, संशोधन केंद्राच्यावतीने ॲड. युवराज नरवणकर यांनी उच्च न्यायालयात केली आहे.

या याचिकेवर न्यायमूर्ती गौतम पटेल आणि न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी ॲड नरवणकर यांनी राज्य सरकारने कोरोनाच्या लसीचा पुरवठा करण्यासाठी सरकारी आणि खासगी केंद्रांना जून २०२१ मध्ये मान्यता दिली. तसा पुरवठाही केला. सुरूवातील लसीचा तुटवडा असल्याने खासगी केंद्रावर लोकांनी पैसे देऊन लस दिली होती. दरम्यानच्याकाळात लसीचा मुबलक पुरवठा सरकारी केंद्रांवर होऊ लागल्याने राज्यातील खासगी केंद्रांवरील कोलसीच्या लाखो डोस पडुन आहेत.

# १० मार्चनंतर मविआला सत्ता सोडावी लागेल! चंद्रकांत पाटलांचा पुनरुच्चार

पुणे- 'राज्यातील सत्ताधारीमहाविकास आघाडीतील अंतर्गत मतभेदउफाळले आहेत आणि आघाडीचे मंत्री एकापाठोपाठ तुरुंगाच्या दिशेने जात आहेत. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल १० मार्च रोजी लागल्यानंतर अशी स्थिती निर्माण होईल की, महाविकास आघाडीला सत्तेवरून जावे लागेल', असा पुनरुच्चार चंद्रकांत पाटील यांनी केला आहे. भाजपा कार्यकर्त्यांच्या विरोधात पोलिसांकडून होत असलेल्या पक्षपाती कारवाईच्या विरोधात पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तांना निवेदन सादर केल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

'महाविकास आघाडी सरकारची सध्याची स्थिती पाहिली तर कोणीही विश्लेषण करणारा सांगू शकेल की, हे सरकार आता फार दिवस टिकणार नाही. आघाडीतील मतभेद उफाळले आहेत. दोन मंत्र्यांचा राजीनामा झाला. तसे बाकीच्यांचेही होतील. पोलिसांच्या बदल्यांबाबत माजी मुख्य सचिव सीताराम कुंटे यांनी त्यांना अनिल देशमुख यांच्याकडून यादी मिळत होती असे सांगितले. तर देशमुख म्हणतात की, त्यांना शिवसेनेचे मंत्री अनिल परब यांच्याकडून मिळत होती व ते ती पुढे पाठवत होते. दुसरीकडे आयपीएस अधिकारी परमवीरसिंग यांनी सांगितले की, सचिन वाझे याला पुन्हा नोकरीत घेण्यासाठी त्यांच्यावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी दबाव आणला होता. या गंभीर आरोपांनंतर आघाडीच्या नेत्यांनी काहीही संवेदनशीलता दाखवली नसली तर ही प्रकरणे गुन्ह्याची आहेत.

# बॅंक व्यवस्थापकाची पत्नी, मुलाकडून सातव्या मजल्यावरून ढकलून हत्या

■ मुंबई

**अंधेरीमध्ये** राहणाऱ्या स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडियाच्या (सिडबी) सहव्यवस्थापकाची त्याची पत्नी आणि मुलाने सातव्या मजल्यावरून खाली ढकलून हत्या केली. संतनकृष्णन शेषाद्री असे या सहायक व्यवस्थापकाचे नाव असून, अंबोली पोलिसांनी त्यांच्या पत्नी जयशीला आणि मुलगा अरविंद या दोघांना अटक केली.पोलिसांना संशय येऊ नये यासाठी या दोघांना ही आत्महत्या असल्याचे भासविले. मात्र घटनास्थळाचा बारकाईने पंचनामा करून पोलिसांनी काही तासांतच ही हत्या असल्याचे उघडकीस आणले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंधेरी पश्चिमेकडील वीरा देसाई मार्गावर असलेल्या सिडबी बँकेच्या ऑफिसर क्वार्टर्समध्ये सातव्या मजल्यावर संतनकृष्णन शेषाद्री हे पत्नी आणि मुलासह वास्तव्यास आहेत. शुक्रवारी पहाटे साडेचारच्या सुमारास संतनकृष्णन सातव्या मजल्यावरून खाली कोसळले. काही वेळाने जयशीला आणि अरविंद जोरजोरात ओरडू लागल्याने आजुबाजूचे रहिवासी जागे झाले. उडी मारली, आत्महत्या केली असे ते ओरडत होते. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांना देखील त्यांनी तेच सांगितले. मात्र पोलिसांनी रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या संतनकृष्णन यांचे बारकाईने निरीक्षण केले असता, त्यांच्या हाताची नस कापली असल्याचे लक्षात आले.


## जाहीर नोटीस

के - ६/४०५, न्यू हरीओम को-ऑ.हौ.सो. (लि). सुर्या कॉम्प्लेक्स, एमएमआरडीए कॉलनी, स्टेशन रोड, कांजुरमार्ग (प) मुंबई. ४०००७८ आमच्या सोसायटीचे सभासद श्री. विश्वनाथ विक्रम तिवारी यांचे २९-०९-२०१३ रोजी निधन झाले असुन त्यांनी वारस फॉर्म भरला नसल्यामुळे त्यांचा वारस तपास करण्यात येत आहे, तरी त्यांचे जे वारस असतील त्यांनी योग्य त्या पुराव्यासहित १५ दिवसांच्या आत सोसायटीच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सायंकाळी ८.३० - १०.०० या वेळेत संपर्क साधावा.

आपले विश्वासू,  
न्यू हरिओम को-ऑ. हौ. सो.(लि).


# ऑडिटच्या नावाखाली कागदपत्रे तपासणीसाठी हॉटेलमध्ये नेली

**सिंधुदुर्ग, प्रतिनिधी-** तालुक्यातील म्हापण ग्रामपंचायत मधील महत्त्वाची कागदपत्रे ऑडिट करण्यासाठी तत्कालीन ग्रामविकास अधिकारी अनिल चव्हाण गावातील खाजगी हॉटेल मध्ये अनधिकृत रित्या घेऊन गेले होते. याबाबत गावचे सरपंच, विद्यमान ग्रामसेवक यांना कोणतीही कल्पना न देता हा गैरकारभार सुरू असल्याचे ग्रामपंचायत सदस्य व लोकप्रतिनिधी यांना समजताच त्यांनी संबंधित ठिकाणी जाऊन हा प्रकार रोखला आणि चव्हाण यांना धारेवर धरले. तसेच ग्रामपंचायत सदस्य यांनी या प्रकरणी रीतसर तक्रार निवती पोलीस ठाण्यात दिली असून चौकशीअंती दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

म्हापण ग्रामपंचायतीमध्ये काही जुनी कागदपत्रांची माहिती घेण्यासाठी शुक्रवारी सदस्य गेले होते. कार्यालयात चौकशी

**म्हापण ग्रामपंचायतीतील प्रकार**

केली असता ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांकडून ऑडिट चालू आहे असे समजले, परंतु ग्रामपंचायत कार्यालयात कोणीही ऑडिटर नाहीत. काहीतरी गडबड असल्याचे सदस्यांच्या लक्षात आले म्हणून माहिती घेतली असता ग्रामपंचायतचे ऑडिट हे कार्यालयात न करता गावातील सिद्धी गेस्ट हाऊस (लॉजिंग बोर्डिंग) येथे चालू असल्याचे समजले. तत्काळ ग्रामपंचायत सदस्य संजोग अंकुश परब, संदीप ज्ञानदेव खोत, गुरुप्रसाद भगवान चव्हाण यांनी पंचायत समिती सदस्य गौरवी मडवळ, माजी सभापती विकास जर गवंडे तसेच विजय ठाकूर, जगदीश म्हापणकर, चंद्रकांत चव्हाण, नाथा मडवळ यांच्या सह सदर हॉटेल येथे जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी म्हापण ग्रामपंचायतीची कागदपत्रे, रेकॉर्ड हे तत्कालीन ग्रामसेवक तथा ग्रामविकास अधिकारी अनिल चव्हाण हे रेकॉर्ड सहित हॉटेल च्या वरील मजल्यावर चाळत असल्याचे दिसून आले. सदर ठिकाणी इतर कोणीही आढळून आलेले नाहीत. काही वेळानंतर ऑडिटर तेथे आले त्यांच्याकडे चौकशी केली असता सदर रेकॉर्ड कोणी आणले याची कोणतीही कल्पना आपल्याला नसल्याचे त्यांनी सांगितले.


## मर्काटॉर लिमिटेड

MERCATOR

सीआयएन: L63090MH1983PLC0314118  
नोंद. कार्यालय: ८३-८७, ८ वा मजला, मित्तल टॉवर, बी-विंग, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१.  
दूर.: +९१ २२-६६३७३३३३; फॅक्स: +९१ २२ ६६३७३३४४;  
ईमेल: secretarial@mercator.co.in, वेबसाईट: www.mercator.co.in

वि. ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊमाहीकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचा सारांश (रु. कोटींमध्ये, ईपीएस वगळता)

| अ. क्र. | तपशील | संपलेले त्रैमासिक | | संपलेली नऊमाही | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३१.१२.२०२१ (अलेखापरिक्षित) | ३१.१२.२०२० (अलेखापरिक्षित) | ३१.१२.२०२१ (अलेखापरिक्षित) | ३१.१२.२०२० (अलेखापरिक्षित) | ३१.०३.२०२१ (लेखापरिक्षित) |
| १. | कार्यातून एकूण उत्पन्न | - | १४४.८८ | - | ३६९.८१ | ३७३.७८ |
| २. | कालावधीकरिता निव्वळ नफा /(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपूर्व) | (४.१७) | (६२.७५) | (१९.८१) | (१९७.९७) | (३०४.०९) |
| ३. | कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपश्चात) | (४.१७) | (६२.७५) | (१९.८१) | (१९७.९७) | (३०४.०९) |
| ४. | कालावधीकरिता करपश्चात निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असामान्य बाबींपश्चात) | (४.१७) | (६५.३३) | (१८.६९) | (२०४.११) | (३१९.६७) |
| ५. | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता नफा/(तोटा) (कर पश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात) समाविष्ट) | (४.१७) | (६५.३३) | (१८.६९) | (२०४.११) | (३१९.६७) |
| ६. | सम भाग भांडवल | ३०.२५ | ३०.२५ | ३०.२५ | ३०.२५ | ३०.२५ |
| ७. | राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळता) गत वर्षीच्या लेखापरिक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार | - | - | - | - | (१,३९९.३०) |
| ८. | प्रति भाग उत्पन्न (रु. १/- प्रत्येकी) मूळ : सौम्यीकृत : | (०.१४) | (२.३९) | (०.६२) | (७.१७) | (१०.९८) |

टिपा:

१. वरील विवरण हे शुक्रवार, ११ फेब्रुवारी, २०२२ रोजी घेण्यात आलेल्या सभेमध्ये मंजूर केल्यानुसार दि. ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊमाहीकरिता कंपनीच्या अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाच्या विस्तृत प्रारुपाचा सारांश आहे. हे विवरण कंपनीची वेबसाईट म्हणजेच www.mercator.in वर आणि जेथे कंपनीचे भाग सूचीबद्ध आहेत त्या बीएसई लिमिटेडची वेबसाईट www.bseindia.com व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाईट www.nseindia.com येथे उपलब्ध आहेत.
२. विद्यमान लेखा उपचारासोबत पुष्टी करण्याकरिता गत कालावधी/वर्षाचे आकडे आवश्यक असेल तेथे पुनर्वर्गिकृत/पुनर्गठित करण्यात आले आहेत.
३. आयबीसीच्या तरतुदींअंतर्गत एनसीएलटी मुंबई शाखेच्या दि. ०८ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या आदेशान्वये कंपनीविरुद्ध कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया (सीआयआरपी) सुरू करण्यात आली आहे. श्री. गिरीश सिरिराम जुनेजा यांना धनको समितीद्वारे (सीओसी) ठराव व्यावसायिक (आरपी) म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. कंपनीच्या २४ उपकंपन्या आहेत. उपकंपन्या या स्वतंत्र कायदेशीर संस्था असल्यामुळे सहाय्यक वित्तीय अहवाल बनविणे आणि सादर करण्याची जबाबदारी संबंधित व्यवस्थापनांवर आहे. आरपी यांनी सदर एकत्रित वित्तीय निष्कर्षाचे विवरणपत्र सद्भावनेने आणि कंपनीच्या संचालक मंडळाचे अधिकार निर्वहनाच्या मर्यादित प्रमाणात, जे संकेताच्या कलम १७ च्या तरतुदींनुसार त्यांना प्रदान केलेले आहे, रेकॉर्डवर घेतले आहे.
४. प्रमुख स्वतंत्र वित्तीय माहिती खाली दिल्यानुसार: (रु. कोटींमध्ये)

| अ. क्र. | तपशील | संपलेले त्रैमासिक | | संपलेली नऊमाही | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३१.१२.२०२१ (अलेखापरिक्षित) | ३१.१२.२०२० (अलेखापरिक्षित) | ३१.१२.२०२१ (अलेखापरिक्षित) | ३१.१२.२०२० (अलेखापरिक्षित) | ३१.०३.२०२१ (लेखापरिक्षित) |
| १. | कार्यातून एकूण उत्पन्न | - | ४.९५ | - | ८.३० | ६.८५ |
| २. | कर पूर्व नफा | (०.३६) | (५८.४०) | ४.९८ | (१४५.२०) | २०३.७७ |
| ३. | कर पश्चात निव्वळ नफा | (०.३६) | (५८.४०) | ५.३० | (१४५.२०) | (२१३.१२) |

मर्काटॉर लिमिटेड करिता  
सही/-  
गिरिश सिरिराम जुनेजा  
ठराव व्यावसायिक  
IBBI/IPA-001/IP-P00999/2017-2018/11646

ठिकाण: मुंबई  
दिनांक: ११ फेब्रुवारी, २०२२


# दापोलीत शिवसेनेचे नेतृत्व सूर्यकांत दळवींकडे सोपवणार?

**रत्नागिरी, प्रतिनिधी-** दापोली, मंडणगड नगरपंचायत निवडणुकीतील विजयामुळे खुश झालेल्या अनिल परब यांनी विजयाचा हाच फॉर्म्युला कायम ठेवणार असून विधानसभा निवडणुकीच्या वेळीदेखील माजी आमदार सूर्यकांत दळवी यांच्याकडेच सर्व सूत्रे रहातील असे संकेत दिले आहेत.

दापोली, मंडणगड नगरपंचायत निवडणुकीमध्ये मिळालेल्या यशामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पदाधिकार्यांचा आत्मविश्वास दुणावला आहे. शिवसेना-राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडीच्या या फॉर्म्युलावरच दापोलीच्या नगराध्यक्षपदी शिवसेनेच्या ममता मोरे यांची निवड झालेली आहे. त्यामुळे पुढील पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुकीत हाच फॉर्म्युला राबिवण्यात येणार असल्याचे सूतोवाच अनिल परब यांनी केले आहे. दापोली नगरपंचायत निवडणुकीतील विजयामुळे माजी आमदार सूर्यकांत दळवी यांचे नेतृत्व यशस्वी ठरले आहे. त्यामुळे खुश झालेल्या पालकमंत्री अनिल परब यांनी आगामी काळात आम्ही सूर्यकांत दळवी यांना कायम आनंदित ठेवण्याचा प्रयत्न करू, असे म्हटले आहे. दापोली विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेचे नेतृत्व माजी आमदार दळवी यांचेकडेच आगामी काळातही राहील, असे संकेत त्यांनी दिले आहेत. अनिल परब यांच्या या वक्तव्याने दापोली मतदारसंघात पुन्हा एकदा रामदास कदम विरुद्ध सूर्यकांत दळवी असा शिवसेनेतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दापोलीमध्ये वर्चस्व कुणाचे हे येणारा काळच ठरवेल.


## जाहीर नोटीस

याद्वारे तमाम जनतेस सुचित करण्यात येत आहे की, **कै. कौशल्या निवृत्ती सातपुते** यांचे दिनांक २९/०१/२०१५ रोजी निधन झाले असून राहणार **सदनिका क्र.५०७, पाचवा माळा, ओम शिव मातोश्री एस.आर.ए.सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., सोन्या बुध्या कंपाऊंड, एल.टी.रोड, दहिसर (प.), मुंबई - ४०००९२.** या सदनिकेचे त्यांनी त्यांच्या हयातीमध्ये नामनिर्देशन केलेले नाही. तसेच मृत व्यक्तींची मुले/मुली **श्री. राम निवृत्ती सातपुते (मुलगा), श्री.सुरेश निवृत्ती सातपुते (मुलगा), श्री.राधाकृष्ण निवृत्ती सातपुते (मुलगा) व श्रीमती अरुणा शिवाजी कांबळे (मुलगी)** यांनी केलेल्या दाव्यानुसार/अर्जानुसार वरील सदनिकेचा संपुर्ण मालकी अधिकार त्यांच्या नावे हस्तांतरीत करण्यात यावे असा अर्ज दाखल केलेला आहे. त्या अर्जाच्या अनुषंगाने संस्था ह्या नोटीसीद्वारे कळवित आहे की, वरील सदनिकाचे हक्कदार/वारसदार **श्री. राम निवृत्ती सातपुते, श्री.सुरेश निवृत्ती सातपुते, श्री.राधाकृष्ण निवृत्ती सातपुते व श्रीमती अरुणा निवृत्ती सातपुते** (मुलगी यांचे लग्नानंतरचे नाव श्रीमती अरुणा शिवाजी कांबळे असे असून) यांच्या व्यतिरिक्त जे कोणी सदनिका क्र. ५०७ च्या हक्काचा दावा करीत असेल तसा लेखी अर्ज व सोबत ठोस पुराव्यासहीत ही नोटीस जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीकडे देण्यात यावा. जर दिलेल्या कालावधीत कोणताही दावा/आक्षेप प्राप्त झाला नाही तर संस्था सदर सदनिकेचा मालकी हक्क कायद्याप्रमाणे निर्णय घेण्यास स्वतंत्र असेल. जर कोणालाही वरील नमुद सदनिकेबद्दल कोणताही दावा/आक्षेप असल्यास १५ दिवसांच्या आत संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीशी संपर्क साधावा.

**आपले विनीत!**  
**ओम शिव मातोश्री एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**  
**रमेश पुरी**  
**अध्यक्ष/ सेक्रेटरी**